## रिटेल फायनान्स :-

**नविन दुचाकी/चारचाकी वाहन खरेदी**

**१) पगारदार नोकरांसाठी -**
**कर्जमर्यादा -** एकूण कोटेशनच्या ८०% जास्तीत जास्त रु.२५.०० लाख
**मुदत-** ७ वर्षे (मासिक हप्ता),
**व्याजदर -** १२.५०% (ज्या त्या वेळच्या धोरणानुसार व्याजदर राहील)

**कर्जदार पात्रता -**

१) अर्जदार हा सांगली जिल्हयातील रहिवाशी असणे आवश्यक.
२) अर्जदार यांचा मासिक पगार वितरणासाठी बँकेत/शाखेत जमा होणे आवश्यक राहील.
३) अर्जदार व जामिनदार बँकेचा ब वर्ग सभासद असणे आवश्यक.
४) अर्जदार हा शासकीय, निमशासकीय, स्थानिक स्वराज्य संस्था,जि.प.शाळा, माध्यमिक, उच्च माध्यमिक,महाविद्यालयीन (संस्थेत) कायमस्वरुपी नोकर असला पाहिजे. त्याची किमान ३ वर्षे कायम सेवा झाली पाहिजे व उर्वरित सेवा कमीत कमी ५ वर्षे असणे आवश्यक.
५) अर्जदार यांचे पगारातून संभाव्य घर कर्जाचा हप्ता व इतर सर्व प्रकारच्या कपाती वजा जाता एकूण पगाराचे २५% इतकी रक्कम रोख शिल्लक राहीली पाहिजे.
६) दोन जामिनदारांचा पगाराचा दाखला. त्यांचे पॅन कार्ड /आधार कार्ड आवश्यक.
७) सक्षम अधिकाऱ्याकडून (अपाँईटींग ॲथोरिटी) कर्जदाराचा सेवा कालावधी, जन्मतारीख, पगार, वर्तणूकीचा व पगारातून संभाव्य वाहन कर्जाचा हप्ता कपात करुन देणेबाबत अथवा बदली झालेस तसे त्या कार्यालयांस कळविणेबाबतचा विहीत नमुन्यात) दाखला.
८) अर्जदाराचे बँकेमध्ये किमान ६ महिन्यापेक्षा जादा कालावधीचे बचत ठेव (सेव्हिंग्ज) खाते असले पाहिजे.

**तारण -**

१) कर्जातून घेतलेली नवीन दुचाकी/चार चाकी वाहन हे बँकेस हायपोथिकेशनद्वारे तारण राहील.
२) कर्ज मंजूर मर्यादेमधून ५% रक्कम ठेवीमध्ये गुंतवणूक करणेची असून सदरची ठेव कर्जास तारण राहील.